ePaper
वर्ष - 8 । अंक - 350 | UDYAM-MH-26-0158827

## रेव्ह पार्टीमुळे पतीला अटक, आता रोहिणी खडसे पुणे पोलिसांच्या भेटीला



महाईन्यूज ™

### आतील पानांत


- हा भारतीय बुद्धिबळाचा सुवर्णक्षणच!
- "तू वेडा होतास हे मला माहितीये"
- डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाला धमकी?
- पुढील २० वर्षे तुम्ही तिथेच बसणार


www.mahaenews.com । मंगळवार, दि. 29 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## मनी ट्रॅप झाला, हनी ट्रॅप झाला, रमी ट्रॅप झाला : आता 'महायुती' च्या मंत्र्यांचे फोन टॅप होत असल्याने खळबळ...

# 'महायुती'च्या मंत्र्यांचेच फोन टॅप !

### मंत्रिमंडळ विस्तार आणि फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर फोन टॅप होत असल्याचा खळबळजनक आरोप

। नवी दिल्ली / मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज



**महाराष्ट्राच्या राजकारणात नेमके काय चालले आहे, याचा उलगडाच होऊ शकत नाही. पण सत्ताधारी 'महायुती' मध्ये 'ऑल इज नॉट वेल' असे म्हणण्याची वेळ आहे. गेल्या महिन्याभरात मनी ट्रॅप हनी ट्रॅप रमी ट्रॅप ची प्रकरणे बाहेर आली आणि आता 'फोन टॅप' होत असल्याचे वृत्त समोर आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.**



### हे गंभीर आहे!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नवी दिल्ली येथे असून सर्व ज्येष्ठ मंत्र्यांच्या गाठीभेटी घेत आहेत. महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी नियोजन आणि आर्थिक निधी याबाबत त्यांची चर्चा सुरू असल्याचे सांगण्यात येत असले तरी महाराष्ट्रातील मंत्रिमंडळ फेरफार आणि फेरबदल याचीही त्याला पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीवर मात्र सत्ताधारी महायुती मधील मंत्र्यांचे फोन टॅप होत असल्याचे वृत्त पुढे आले असून एकच खळबळ उडाली आहे.

### रोहित पवार यांचे ट्विट..

राज्य मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार असल्याची चर्चा असून अनेक जण त्यासाठी 'फिल्डिंग' लावत असतानाच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एक खळबळजनक ट्विट केले आहे. 'महायुती' मधील मंत्र्यांचे फोन टॅप होत असल्याची चर्चा आहे आणि तशी माहिती सत्ताधारी पक्षांमधूनच आपल्याला मिळाल्याचे त्यांनी म्हटले आहे. रोहित पवार यांचा दावा खरा असला तर 'महायुती' मध्ये खरोखरच अंतर्गत संघर्ष सुरु आहे का? असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. याबाबत आता राज्य सरकारमधील नेतेमंडळी काय उत्तर देतात? ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### प्रचंड बहुमत, स्थैर्य नाही

'महायुती' सरकारला स्थापन होऊन आतासात महिने होत आहेत, पण या सात महिन्यांमध्ये अनेक नेत्यांवर विविध प्रकारचे आरोप झाले आहेत. या आरोपांचा फटका आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'महायुती' ला बसू शकतो. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस मंत्रिमंडळातील वादग्रस्त नेत्यांना घरचा रस्ता दाखवण्याची शक्यता आहे. तसेच स्वच्छ आणि नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी देणार असल्याची चर्चा आहे. अर्थात, याबाबत अधिकृत अशी कोणतीही माहिती समोर आलेली नाही. पण पडद्यामागे मोठ्या घडामोडी घडत असल्याची चर्चा मात्र आहे.

### रोहित पवार नेमके काय म्हणाले?

शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्या 'एक्स' अकाउंटवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी राज्याच्या राजकारणाबाबत मोठा दावा केला आहे. 'काही मंत्र्यांचे फोन बऱ्याचदा नॉट रिचेबल येत असून आपले फोन टॅप होत असल्याने मंत्री स्वतःहूनच फोन बंद ठेवततात, अशी चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. बघू या, या केवळ चर्चा आहेत की वास्तव हे येत्या काही दिवसात कळेलच, असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

### महायुतीत शीतयुद्ध?

महायुतीमध्ये शीतयुद्ध सुरु असल्याच्या चर्चा नेहमी सुरु असतात. हे सरकार स्थापन झालं तेव्हा देखील शीतयुद्ध बघायला मिळालं होतं. सुरुवातीला एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्रीपदाचा दावा सोडायला तयार नव्हते. तसेच त्यांनी काही महत्त्वाच्या खात्यांची देखील मागणी केली होती. पण त्यांच्या सर्व मागण्या मान्य होऊ शकल्या नाहीत. त्यांना मुख्यमंत्रीपदाचा दावादेखील सोडावा लागला होता. तसेच सत्ता स्थापन झाल्यापासून नाशिक आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अद्याप सुटलेला नाही.

# खडकवासला धरणातील विसर्गात वाढ!

## नदीकाठचे रस्ते पाण्याखाली;नागरिकांना इशारा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पानशेत आणि वरसगाव धरणे शंभर टक्के भरण्याच्या मार्गावर असल्याने खडकवासला साखळी प्रकल्पातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी खडकवासला धरणातून सुरू असलेल्या विसर्गात सोमवारी वाढ करण्यात आली. त्यामुळे मुठा नदी दुथडी भरून वाहत असून, नदीकाठच्या परिसरात पुराचे पाणी शिरले.**



नदीपात्रातील रस्त्यासह भिडे पूलही पाण्याखाली गेला असून नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जलसंपदा विभाग आणि महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या वर्षीसारखी पूरपरिस्थिती उद्भवू नये, यासाठी महापालिकेकडून खबरदारी घेण्यात आली आहे. शहराला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या दीड महिन्यापासून या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. या साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कायम असल्याने पानशेत आणि वरसगाव धरणे नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त भरली आहेत.

ही दोन्ही धरणे पाणीसाठ्याच्या दृष्टीने मोठ्या क्षमतेची असून त्या तुलनेत लहान असलेले खडकवासला धरणही ऐंशी टक्क्यांपर्यंत भरले आहे. त्यामुळे खडकवासला धरणातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी खडकवासला धरणातून रविवारपासून विसर्गाला सुरुवात करण्यात आली आहे. खडकवासला धरणातून रविवारी सायंकाळी १८ हजार ४८३ क्युसेक एवढा विसर्ग सुरू होता. हा विसर्ग सोमवारी दुपारी २५ हजार ६९६ एवढा करण्यात आला. मात्र धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर येवा येत असल्यामुळे सायंकाळी सात वाजता त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार तो २८ हजार ६६२ क्युसेक करण्यात आला.

पावसाच्या प्रमाणानुसार तसेच येव्यानुसार विसर्ग कमी-जास्त करण्यात येणार असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. खडकवासला धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरू असल्याने मुठा नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतचा इशारा देण्यात आला आहे. विसर्गात वाढ होण्याची शक्यता असल्याने महापालिकेकडून पथके तैनात करण्यात आली आहेत. विशेषत: सिंहगड रस्ता परिसरातील एकतानगरी, विठ्ठलवाडी येथील नदीकाठच्या अनेक सोसायट्यांना सावध राहण्याची सूचना करण्यात आली. महापालिकेकडून साहाय्यता कक्षही स्थापन करण्यात आला आहे.

### धरणे नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त भरली

नदीपात्रातील रस्त्यासह भिडे पूलही पाण्याखाली गेला असून नदीकाठ परिसरातील नागरिकांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन जलसंपदा विभाग आणि महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या वर्षीसारखी पूरपरिस्थिती उद्भवू नये, यासाठी महापालिकेकडून खबरदारी घेण्यात आली आहे. शहराला खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या चार धरणांतून पाणीपुरवठा केला जातो. गेल्या दीड महिन्यापासून या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात पाऊस होत आहे. या साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाऊस कायम असल्याने पानशेत आणि वरसगाव धरणे नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त भरली आहेत.

# पर्यटनस्थळांवर गर्दी व्यवस्थापन यंत्रणा

## जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधीची तरतूद

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पर्यटनस्थळावरील प्रवेशसंख्या मर्यादित ठेवण्याचे निश्चित करण्यात आल्यानंतर या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन यंत्रणेचा वापर करण्याची शिफारस जिल्हा प्रशासनाने केली आहे. त्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद प्रस्तावित आहे.**



मोठ्या प्रमाणावर गर्दी होणाऱ्या २५ पर्यटनस्थळांच्या सर्वेक्षणानंतर त्यांचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे. मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याची घटना गेल्या महिन्यात घडली होती. त्यामध्ये चार पर्यटकांना जीव गमवावा लागला होता. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पर्यटनस्थळ असलेले गड किल्ले, धबधबे, धरणे अशा परिसरात जाणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेसंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीमध्ये जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बैठक झाली होती. त्यामध्ये डुडी यांनी पर्यटन धोरण तयार करण्याची सूचना केली. त्यानुसार पर्यटनस्थळावरील सोयी-सुविधा वाढविण्याबरोबरच ठरावीक शुल्क आकारण्याचे निश्चित करण्यात आले आहे.गड-किल्ले, धबधबे, धरणे अशा ठिकाणी होणारी गर्दी लक्षात घेऊन या ठिकाणी एका वेळी किती पर्यटकांना प्रवेश द्यायचा, यासंदर्भात चर्चा झाली आहे. प्रवेशसंख्या निश्चित करण्याची सूचना वन विभागाला देण्यात आली आहे. त्यासाठी 'क्राउड मॅनेजमेंट सिस्टीम'चा वापर करण्यात येणार आहे. त्यानुसार स्थानिकांच्या मदतीने पर्यटस्थळावरील पर्यटकांची संख्या निश्चित केली जाणार आहे, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले. दरम्यान, कुंडमळा दुर्घटनेनंतर अपर जिल्हाधिकारी सुहास मापारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ठरावीक अंतरापर्यंत पर्यटकांना प्रवेश द्यावा, असे प्रस्तावित केले आहे. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ५० कोटींच्या निधीची आवश्यकता असून जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तो उपलब्ध करून दिला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील २५ महत्त्वाची पर्यटनस्थळे निश्चित केली जाणार आहेत. पुढील वर्षापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने 'क्राउड मॅनेजमेंट सिस्टिम'चा वापर प्रस्तावित आहे. स्थानिक नागरिक आणि वन विभागाच्या मदतीने ही यंत्रणा राबिवण्यात येईल. सविस्तर प्रकल्प आराखडा करण्याची सूचनाही वन विभागाला देण्यात आली आहे.

### ठरावीक शुल्क आकारण्याचे निश्चित

मोठ्या प्रमाणावर गर्दी होणाऱ्या २५ पर्यटनस्थळांच्या सर्वेक्षणानंतर त्यांचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे.मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळल्याची घटना गेल्या महिन्यात घडली होती. त्यानुसार पर्यटनस्थळावरील सोयी-सुविधा वाढविण्याबरोबरच ठरावीक शुल्क आकारण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

## चाकण औद्योगिक क्षेत्राच्या समस्यामुक्तीसाठी

# महायुती सरकार 'ऑन ॲक्शन मोड'!

## सार्वजनिक बांधकाम मंत्री, उद्योग मंत्र्यांच्या उपस्थितीत पहिली बैठक

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**चाकण औद्योगिक क्षेत्रातीलल वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी भाजपा महायुती सरकार ' ऑन ॲक्शन मोड'वर आले आहे. दि. 30 जुलै रोजी मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीमध्ये सर्व संबंधित विभागांची एकत्रित बैठक नियोजित केली आहे. चाकण औद्योगिक क्षेत्राचे या बैठकीकडे लक्ष लागले आहे.**

चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांबाबत निर्माण झालेल्या गंभीर समस्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. गेल्या आठवड्यात विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली होती आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सविस्तर चर्चा करुन "ॲक्शन प्लॅन" निश्चित करण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू केला होता. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, आता राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये संबंधित सर्व विभागांची बैठक नियोजित केली आहे. या बैठकीत निश्चितपणे धोरणात्मक निर्णय होतील, अशी अपेक्षा आहे.




गत पावसाळी अधिवेशनामध्ये पुणे व पिंपरी-चिंचवडमधील विधानसभा सदस्यांनी आवाज उठवला होता. त्यामुळे चाकण आणि औद्योगिक क्षेत्राच्या प्रश्नांना वाचा फुटली आहे.या बैठकीला अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता, एमएसआयडीसी, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, एमआयडीसी, पुणे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे, पोलीस उपायुक्त (वाहतूक), पिंपरी-चिंचवड, मुख्य अधिकारी, चाकण / तळेगांव नगरपालिका असे प्रमुख अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

> "UNCLOG_Chakan_MIDC" या मोहिमेला केवळ पाठिंबा नव्हे, तर सक्रीयपणे चाकण वाहतूक कोंडी आणि समस्यामुक्त करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत. आगामी काळात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील भाजपा महायुतीचे सरकार हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्तीसाठी ज्या प्रमाणे काम करीत आहे. त्याप्रमाणे चाकण औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> **-महेश लांडगे, आमदार,** भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## जामिनावर सुटलेल्या आरोपींवर पोलिसांचे विशेष लक्ष

### सीसीटीव्ही, मोबाइल ट्रॅकिंग, आणि स्थानिक खबऱ्यांमार्फतही ठेवला जाणार 'वॉच'

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड: गुन्हे करून जामिनावर बाहेर आलेल्या आरोपींच्या हालचालींवर पिंपरी - चिंचवड पोलिसांनी आता करडी नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. अशा व्यक्ती पुन्हा गुन्हेगारी क्षेत्रात सक्रिय होऊ नयेत, यासाठी त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवले जात आहे. गुन्हेगारांनी पुन्हा गुन्हे करू नये तसेच सामाजिक सुरक्षिततेला धोका पोहोचवू नये यासाठी पोलिस आयुक्तांच्या आदेशानुसार ठोस आणि नियोजनबद्ध पावले उचलण्यात आली आहेत.**

उद्योगनगरीतील विविध पोलिस ठाण्यांमध्ये तुरुंगातून जामीनावर बाहेर आलेल्या गुन्हेगारांनी पुन्हा गुन्हा केल्याचे विविध गुन्हे दाखल आहेत. या गुन्हेगारांनी पुन्हा गुन्हे करू नयेत, सामाजिक सुरक्षिततेला धोका पोहोचवू नये, यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. जामिनावर बाहेर आलेल्या गुन्हेगारांवर लक्ष ठेवावे, त्यांच्या हालचालींची नोंद घ्या, अशा सूचना पोलिसांना करण्यात आल्या आहेत. कोणताही आरोपी न्यायालयाच्या आदेशाने जामिनावर सुटल्यानंतर तो ज्या पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहत असेल त्या ठाण्याच्या पोलिस निरीक्षकांना त्या आरोपीबाबत संपूर्ण माहिती ठेवावी लागणार आहे. विशेष म्हणजे संबंधित आरोपीकडून कोणत्याही प्रकारचा दाखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हा घडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना पोलिस अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पोलिस निरीक्षकांसह तपास पथकातील अधिकारी, अंमलदार, गुन्हे शाखा आणि सर्व युनिटनी या गुन्हेगारांची सतत तपासणी करणे आवश्यक आहे. त्यांच्याशी संवाद साधणे, त्यांच्या वावरावर, वागणुकीवर लक्ष ठेवणे, त्यांच्या सहवासातील लोकांची माहिती गोळा करणे, तसेच, त्यांच्याकडून पुन्हा गुन्हा घडण्याची शक्यता असेल तर प्रतिबंधात्मक कारवाई करणे, अशा प्रकारची स्पष्ट रूपरेषा तयार करण्यात आली आहे. काही गंभीर गुन्ह्यांतील आरोपींवर सीसीटीव्ही वॉच, मोबाइल ट्रॅकिंग, आणि स्थानिक खबऱ्यांमार्फतही लक्ष ठेवले जाणार आहे. याबाबत दररोज पोलिस ठाण्यांनी त्यांच्या क्षेत्रातील जामिनावर सुटलेल्या आरोपींचा तपशीलवार अहवाल एम.ओ.बी. कार्यालयात सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अहवालात संबंधित आरोपीची सध्याची स्थिती, तो कोणत्या गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील झाला आहे का, पोलिसांच्या सततच्या देखरेखीमुळे काय परिणाम झाले आहेत, जामिनावर बाहेर असताना संबंधित गुन्हेगाराने पुन्हा गुन्हा केला तर त्याच्यावर कडक कारवाई केली जाणार आहे. या उपक्रमामुळे जामिनावर सुटलेले आरोपी पुन्हा गुन्हेगारी वर्तुळात न शिरता समाजात सुधारलेल्या मार्गाने वागतील. तसेच, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे.

### नागरिकांनी पुढाकार घ्यावा

परिसर सुरक्षेसाठी स्थानिकांनी पुढाकार घ्यावा शहर सुरक्षिततेसाठी पोलिस यंत्रणेसोबत सामान्य नागरिकांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. या मोहिमेचा उद्देश म्हणजे जामिनाचा गैरफायदा घेणाऱ्या आरोपींना रोखणे आणि सामान्य जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा आहे. यासाठी आपल्या परिसरात संशयास्पद व्यक्ती आढळल्यास, वारंवार गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा वावर असल्यास तात्काळ संबंधित पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. नागरिकांनी स्वतःचा परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.




# शेतकऱ्यांना सोयाबीन रडवणार?

**प्रत्येक वेळी भाषणांचा सूर शेतकरीकेंद्री ठेवायचा आणि हित जोपासण्याची वेळ आली की ग्राहकांचा विचार करायचा ही सगळ्याच सरकारांची नेहमीची सवय. याला केंद्रातले विद्यमान मोदी सरकारही अपवाद नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची सध्याची परवड हेच दाखवून देते. कमी खर्चात होणारे व रोखीने पैसा देणारे पीक म्हणून अलीकडे शेतकरी सोयाबीनकडे वळले.**

गेल्या पाच वर्षांत या पिकाच्या लागवड क्षेत्रात सतत वाढ होताना दिसते. यंदा हे क्षेत्र पाच लाख हेक्टरने वाढले. हे पाहता केंद्र व राज्य सरकारांनी सोयाबीनवरील संशोधन, त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग यांना चालना देणे गरजेचे होते. तसे काहीच न झाल्याने सध्या हे उत्पादक गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. भाजपला याचा जोरदार फटका अलीकडे झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात बसला. विदर्भ तसेच मराठवाडा या सोयाबीनच्या प्रदेशात ऐन प्रचाराच्या धामधुमीत शेतकऱ्यांचा आक्रोश अनुभवायला मिळाला. त्यापासून बोध घेण्याचे सौजन्य राज्य व केंद्र दाखवत नसल्याचे सध्याचे चित्र आहे. सध्या सोयाबीनचा बाजारभाव केवळ चार हजार रुपये प्रतिक्विंटल, म्हणजे सरकारने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा ८९२ रुपयांनी कमी आहे. अशा वेळी बाजारात हस्तक्षेप करण्याची



धमक सरकार का दाखवत नाही? केवळ प्रोत्साहनपर मदत वा भरपाई जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देता येणे शक्य नाही हे सरकारला ठाऊक नाही का? कुण्या एका आवडीच्या उद्योगपतीला या मंदीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त खाद्यातेल आयात करता यावे यासाठी सरकारचे हे दुर्लक्ष सुरू आहे का? जनधन, लखपती व करोडपती दीदी अशा आकर्षक योजनांकडे लक्ष वेधण्याबरोबरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा जास्त दर मिळेल याकडे लक्ष का दिले जात नाही, असे प्रश्न निर्माण होतात.देशात सोयाबीनची ८० टक्के लागवड महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेशात होते. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी लोकसभेत भाजपला साथ दिली. पण आता तिथेही या उत्पादकांचे आंदोलन जोर धरू लागले आहे. तेही देशाचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान ज्या सिहोरमधून निवडून आले तिथेच. मावळा प्रांतात सुरू झालेले हे आंदोलन लवकरच सर्वत्र पसरेल असे चित्र आहे. कारण बाजारात नवीन सोयाबीन यायला वेळ आहे. ते आल्यावर भाव आणखी पडतील. सध्याच्या या पडझडीला आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती कारणीभूत आहे. तिथे सध्या फक्त तीन हजार रुपये एवढाच दर आहे हा सरकारचा युक्तिवाद फारच वरवरचा, शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आणि तात्कालिक आहे. देशभरातील लाखो शेतकरी सोयाबीनकडे वळत असताना सरकारने या पिकाची उत्पादकता वाढावी यासाठी आजवर काहीही केले नाही. सध्या भारतात ही उत्पादकता हेक्टरी दहा ते १३ क्विंटल आहे तर ब्राझीलमध्ये ३३ क्विंटल. हेक्टरी उत्पादन वाढावे यासाठी बियाण्यांवर संशोधन करणे, प्रक्रिया उद्योगाचे जाळे उभारण्याला प्रोत्साहन देणे हे सरकारचे काम. त्यातील अपयशाकडे होणारे दुर्लक्ष तेल आयात उद्योगात सक्रिय असणाऱ्यांच्या फायद्यासाठी आहे का? प्रक्रिया उद्योगांचे जाळे उभारले तर आयातीच्या क्षेत्रात असलेली काही मोजक्यांची मक्तेदारी मोडीत निघेल अशी भीती कदाचित सरकारला वाटत असावी. महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांत सोयाबीनवर प्रक्रिया करणारे ६५ उद्योग सुरू झाले. आता त्यातले केवळ ३० कसेबसे सुरू आहेत. त्यांच्या अडचणी सरकारने कधी जाणून घेतल्या का? अशा लहान व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांचे जाळे देशभर विणले जाणे हे कधीही शेतकऱ्यांच्या हिताचे. मात्र विद्यमान सरकारला अशा विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरणातच रस दिसतो. कारण तरच बड्या उद्योगसमूहांचे हित जोपासता येते.आजघडीला भारत सोयाबीन उत्पादनात जगात पाचव्या क्रमांकावर आहे. सर्वच क्षेत्रांत पहिल्या तीनमध्ये येण्याची घाई झालेल्या केंद्र सरकारला या क्षेत्रातही अशी भरारी गाठावी असे का वाटत नाही? कृषिक्षेत्राशी संबंधित अडचणी उद्भवतात तेव्हा रोख मदत करून शेतकऱ्यांचा रोष शांत करणे यालाच प्राधान्य देण्याचे काम सरकारे करत आली

## संपादकीय »

### द्रौपदी प्रश्न न पूछेगी

***...ही एका अर्थी मानवी प्रवृत्ती म्हणायची. पण सर्वोच्च घटनात्मक पदावरील व्यक्तीनेही राजकारणविरहित विचार करू नये, हे सत्य दुर्दैवी.***

चला, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू एकदाच्या बोलल्या. राष्ट्रपतींचे एरवी औपचारिक बोलणे हे मंत्रिमंडळाने मंजूर केलेले असते. पण आता त्या जे काही बोलल्या, ते त्या बोललेल्या नाहीत, त्यांनी लिहिले. आपल्या स्वतंत्र प्रज्ञेच्या आधारे त्यांनी 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' या वृत्तसंस्थेसाठी लेख लिहिला. त्यामुळे गेल्या कित्येक दिवसांनंतर या देशातील माता, भगिनी आणि कन्या यांच्या चेहऱ्यावर हास्य नाही; पण निदान समाधानाची हलकीशी रेषा तरी उमटली असेल. अलीकडे स्वतंत्र प्रज्ञाधारी लोक 'एएनआय' या वृत्तसंस्थेस खास मुलाखती देतात. अलीकडच्या भारतीय पत्रकारितेत या संस्थेचे स्थान बिनीचे. कधी कधी तर एखादी घटना घडायच्या आधीच 'एएनआय' या वृत्तसंस्थेस तिची खबरबात लागलेली असते आणि त्यांचे वृत्तछायाचित्रकार मोक्याच्या ठिकाणी दबा धरून बसलेले असतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या आधी ब्रिटिश काळात फेडरल कोर्ट होते. त्याला आधार १९३५ च्या भारत सरकार कायद्याचा होता. नव्याने स्थापन केलेल्या सर्वोच्च न्यायालयाची रचना निर्धारित करणे हे सुरुवातीला संविधानकर्त्यांसमोर आणि नंतर संसदेसमोर आव्हान होते.

## संविधानाच्या तटबंदीचे संरक्षक

संविधानसभेने सुरुवातीला सरन्यायाधीश आणि इतर सात न्यायाधीश अशा आठ जणांचे सर्वोच्च न्यायालय असेल अशी तरतूद केली. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार संसदेला असेल, असेही तेव्हाच ठरवण्यात आले. त्यानुसार टप्प्याटप्प्याने न्यायाधीशांची संख्या वाढवण्यात आली. सध्या २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या सरन्यायाधीशांसह ३४ इतकी आहे.सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी पात्रता काय असते? सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यासाठी दोन प्रमुख अटी आहेत: (१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी. (२अ) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. (२ ब) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयात किमान १० वर्षे वकिलीचा अनुभव असावा. (क)



राष्ट्रपतींच्या मते सदर व्यक्ती ही विख्यात कायदेतज्ज्ञ असावी. या अटींची पूर्तता होत असेल तर त्या व्यक्तीची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी होऊ शकते.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावर नियुक्त होत असताना राष्ट्रपतींच्या उपस्थितीत संविधानाची शपथ घ्यावी लागते. संविधानाप्रतिच्या निष्ठेबाबत आणि भारताचे सार्वभौमत्व, अखंडत्व टिकेल, अशा वर्तनाबाबत ही शपथ आहे. न्यायाधीशांचे वेतन, भत्ते याबाबत संसद निर्णय घेते. एकत्रित निधीतून या वेतनाचे नियोजन केले जाते. न्यायाधीशांचा कार्यकाळ निश्चित नाही, मात्र वय वर्षे ६५पर्यंत ते कार्यरत राहू शकतात. त्यानंतर ते सेवानिवृत्त होतात. त्याआधी ते राष्ट्रपतींना राजीनामा पत्र लिहून सेवेतून मुक्त होऊ शकतात किंवा राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात. राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्यासाठी मुख्यत: दोन कारणे पुरेशी असतात: (१) सिद्ध झालेले गैरवर्तन (२) अकार्यक्षमता. पदावरून काढण्यासाठीची प्रक्रिया १९६८ सालच्या न्यायाधीश चौकशी कायद्यात दिलेली आहे. त्यानुसार लोकसभेच्या १०० किंवा राज्यसभेच्या ५० सदस्यांनी प्रस्ताव सादर करावा लागतो. तो अध्यक्षांनी किंवा सभापतींनी पटलावर ठेवण्यास परवानगी दिली की चौकशी समिती स्थापन केली जाते. या चौकशी समितीनुसार न्यायाधीश दोषी सिद्ध झाल्यानंतर त्यांना पदावरून मुक्त करण्याचा ठराव संसदेसमोर ठेवला जातो. याला महाभियोगाचा ठराव म्हणतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# भ्रष्टाचारी,मंत्री, आमदारांना बडतर्फ करा!

## शिवसेना ठाकरे गटाची राज्यपालांकडे मागणी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्य सरकारमधील कलंकित, भ्रष्टाचारी आणि असंवेदनशील मंत्री आणि आमदारांना बडतर्फ करावे. सरकार भ्रष्ट आमदार व मंत्र्यांना पाठीशी घालत असून राज्यपालांनीच आता कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेने (ठाकरे) राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन केली.**



ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार संजय गायकवाड, विधिमंडळाच्या अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर, भाजपचे गोपीचंद पडळकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गेल्या काही दिवसात शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील काही मंत्र्यांची वादग्रस्त प्रकरणे समोर आली. या प्रकरणांवर विरोधी पक्ष म्हणून पावसाळी अधिवेशनात आवाज उठविण्यात आला. मात्र सरकारकडून न्याय मिळत नसून सरकारच या कलंकित मंत्र्यांना पाठीशी घालत आहे. त्यामुळे आम्ही राज्यपालांकडे न्याय मागण्यासाठी आलो आहोत. राज्यपाल आम्हाला न्याय देतील अशी अपेक्षा आहे, असे परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर सांगितले.शिरसाट यांच्या घरात नोटांनी खचाखच भरलेली बॅग आढळली. त्यांनी हॉटेल व्हिट्सच्या निविदा प्रक्रियेत घोटाळा केला, एमआयडीसीतील पार्किंगचा भूखंड स्वतःसाठी घेतला. माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल अपमानजनक वक्तव्य केली.

लोकशाहीच्या मंदिरात ते रमी खेळताना आढळले आहेत. राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावे असलेल्या डान्सबारवर पोलीसांनी कारवाई करून २२ बारबाला पकडल्या. राज्याचे गृह राज्यमंत्री बेकायदेशीर डान्सबार चालवतात. लोकांच्या घरकुलाच्या वाळूचा साठा करून स्वतःच्या स्वार्थासाठी वापरतात. तरीही राज्याचे गृहमंत्री, मुख्यमंत्री झोपलेले आहेत का ? असा सवाल दानवे यांनी यावेळी केला. हनी ट्रॅपमध्ये काही मंत्र्यांचा सहभाग आहे. एकनाथ खडसेंनी या विषयावर सातत्याने आवाज उठवला. ठाणे-घोडबंदर भुयारी मार्गातील निविदेतील घोटाळा, पडळकर यांचे ख्रिश्चन समुदायाला उद्देशून ठोकून काढा हे वादग्रस्त विधान, तसेच एका वृद्ध महिलेची १७ एकर जमीन हडप केल्याचे प्रकरण, नितेश राणेंची वादग्रस्त विधाने, आमदार संजय गायकवाड यांनी मंत्रालय आमदार निवासाच्या उपहारगृहातील कर्मचाऱ्याला केलेली मारहाण, अर्जुन खोतकर यांच्या धुळे दौऱ्यादरम्यान कोट्यवधी रुपये सापडणे याबाबत राज्यपालांकडे तक्रार करण्यात आली आहे.राज्यपाल न्याय देतील अशी अपेक्षा आहे. मात्र त्यांनी न्याय दिला नाही तर आम्ही जनतेच्या दरबारात जाणार, असे दानवे म्हणाले. राज्यपालांना भेटलेल्या शिष्टमंडळात आमदार अनिल परब, नितीन देशमुख, अनंत नर, महेश सावंत, मनोज जामसुतकर, मिलिंद नार्वेकर, माजी आमदार विनोद घोसाळकर, विशाखा राऊत, नेत्या सुषमा अंधारे इत्यादींचा समावेश होता.ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आमदार संजय गायकवाड, विधिमंडळाच्या अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर, भाजपचे गोपीचंद पडळकर यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### शेतकऱ्यांबद्दल अपमानजनक वक्तव्य

गेल्या काही दिवसात शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील काही मंत्र्यांची वादग्रस्त प्रकरणे समोर आली. या प्रकरणांवर विरोधी पक्ष म्हणून पावसाळी अधिवेशनात आवाज उठविण्यात आला. मात्र सरकारकडून न्याय मिळत नसून सरकारच या कलंकित मंत्र्यांना पाठीशी घालत आहे. त्यामुळे आम्ही राज्यपालांकडे न्याय मागण्यासाठी आलो आहोत. राज्यपाल आम्हाला न्याय देतील अशी अपेक्षा आहे, असे परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपालांच्या भेटीनंतर सांगितले.शिरसाट यांच्या घरात नोटांनी खचाखच भरलेली बॅग आढळली. त्यांनी हॉटेल व्हिट्सच्या निविदा प्रक्रियेत घोटाळा केला, एमआयडीसीतील पार्किंगचा भूखंड स्वतःसाठी घेतला. माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांबद्दल अपमानजनक वक्तव्य केली.

# महाराष्ट्राकडे बुद्धी आणि बळ दोन्ही आहे

## मनसे अध्यक्ष राज ठाकरेंकडून FIDE विजेत्या दिव्या देशमुखचं कौतुक

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**भारताची युवा बुद्धिबळपटू दिव्या देशमुख हिने मोठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. दिव्याने एफआयडीई विश्वचषक स्पर्धेच्या (बुद्धिबळ) अंतिम फेरीत भारताची ग्रँडमास्टर कोनेरू हम्पी हिचा पराभव करत विश्वविजेतेपदाला गवसणी घातली आहे. १९ वर्षीय दिव्या देशमुख हिने टायब्रेकरमध्ये गेलेल्या सामन्यात उत्कृष्ट चाली चालत कोनेरू हम्पीला पराभूत केलं.**



जॉर्जियाच्या बटुमी येथे पार पडलेल्या एफआयडीई महिला विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या या दोन्ही लेकी एकमेकींविरूद्ध खेळत होत्या. दोन भारतीय खेळाडू या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झाल्याने विश्वविजेतेपद भारतातच येणार हे निश्चित होतं. दोघींपैकी कोण जिंकणार याचाच निकाल आज (२८ जुलै) अंतिम सामन्यात लागणार होता. या अंतिम सामन्यात दिव्या देशमुखने अनुभवी कोनेरू हम्पीला टायब्रेकमध्ये पराभूत करून शानदार विजय मिळवला.

या विजयामुळे दिव्या देशमुखने भारताची चौथी महिला ग्रँडमास्टर बनण्याच्या दिशेने एक पाऊल टाकलं आहे ही स्पर्धा तब्बल २४ दिवस चालली आणि अंतिम फेरीत दिव्याने अत्यंत संयम, कौशल्य आणि आत्मविश्वास दाखवून ऐतिहासिक कामगिरी केली.दिव्याच्या या कामगिरीनंतर तिच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील खास शब्दांत दिव्याचं कौतुक केलं आहे. राज यांनी दिव्याबाबत एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की “अवघ्या १९ वर्षांच्या मराठमोळ्या दिव्या देशमुखने बुद्धिबळाच्या (FIDE) विश्वचषक स्पर्धेत भारताच्याच कोनेरू हंपीला हरवून विश्वविजयपद मिळवलं.

### काय आहे मूळ प्रकरण ?

दोन भारतीय महिला बुद्धिबळाच्या पटावर विश्वविजयासाठी चाली रचत आहेत हे दृश्यच खूप सुंदर आहे आणि कुठल्याही परिस्थितीत भारताकडेच विश्वविजय पद आलं असतं हा देखील आनंदाचा भाग. पण दिव्याचं मनापासून अभिनंदन.”मनसे अध्यक्ष म्हणाले, “या निमित्ताने अधिकाधिक महिला बुद्धिबळपटू तयार होऊ देत, त्यांना विजयाला गवसणी घालण्याची प्रेरणा मिळू दे हीच इच्छा. महाराष्ट्राकडे बुद्धी आणि बळ दोन्ही ओतप्रोत आहे, ते जेव्हा जेव्हा महाराष्ट्राचं नाव मोठं करायला वापरलं जातं तेव्हा खूप आनंद होतो. दिव्या तुझं पुन्हा एकदा अभिनंदन!”जॉर्जियाच्या बटुमी येथे पार पडलेल्या एफआयडीई महिला विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या या दोन्ही लेकी एकमेकींविरूद्ध खेळत होत्या. दोन भारतीय खेळाडू या स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झाल्याने विश्वविजेतेपद भारतातच येणार हे निश्चित होतं.

# डोनाल्ड ट्रम्प यांची रशियाला धमकी?

## युक्रेन शांतता करारावर सहमती देण्यासाठी 10 किंवा 12 दिवस

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून ते आजपर्यंत अनेक मोठ्या निर्णयांचा धडाका लावला आहे. आयात शुल्कासह बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मुद्द्यांसह आदी मोठ्या निर्णयांचा सहभाग आहे. या निर्णयामुळे जगातील अनेक देशांना मोठा फटका देखील बसला. काही दिवसांपूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी दक्षिण कोरिया, जपानसह १२ देशांवर नव्याने टॅरिफ लागू करण्याचा निर्णय घेतला.**



तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी BRICS देशांनाही आर्थिक भुर्दंडाचा इशारा दिला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी थेट रशियाला धमकी दिली होती की जर व्लादिमीर पुतिन यांनी ५० दिवसांत युक्रेन बरोबरील युद्धबंदी करण्यास सहमती दर्शवली नाही तर रशिया विरुद्ध कठोर टॅरिफ लागू करण्यात येईल. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला पुन्हा एकदा धमकी देत रशियाला १० ते १२ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.'व्लादिमीर पुतिन यांच्याकडे युक्रेन शांतता कराराला सहमती देण्यासाठी फक्त पुढील १० किंवा १२ दिवस आहेत. पुढील १० किंवा १२ दिवसात रशियाने शांतता कराराला सहमती दिली नाही तर रशियाला कठोर निर्बंधांना सामोरं जावं लागेल', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

तसेच युक्रेनबरोबरील संघर्ष लांबवल्यामुळे व्लादिमीर पुतिन यांच्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली आहे. "काय होणार आहे हे त्यांना माहित असल्यामुळे इतकी वाट पाहण्यात काही अर्थ नाही", असं ट्रम्प म्हणाले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं की,"रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबद्दल निराशा वाढल्यामुळे आता मी कठोर निर्बंधांबाबतचं सुधारित वेळापत्रक तयार करण्याचा निर्णय घेतला आहे.

मी त्यांना दिलेले ५० दिवस कमी करणार असून आता मॉस्कोला १० ते १२ दिवसांचा कालावधी असेल", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितलं. दरम्यान, रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने ट्रम्प यांच्या या इशाऱ्यानंतर प्रतिक्रिया देताना म्हटलं की,"अल्टीमेटम, ब्लॅकमेल आणि धमक्यांची भाषा मॉस्कोला अस्वीकार्य आहे.

"डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं की, "युक्रेनबरोबरील युद्धबंदी करण्यास रशियाने सहमती दर्शवली नाही आणि ५० दिवसांत आमचा करार झाला नाही तर आम्ही रशियावर दुय्यम कर लादणार आहोत आणि मग ते १०० टक्के टॅरिफ असेल", असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता.डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी ब्रिक्स देशांना देखील मोठा इशारा दिला होता.

जो कोणता देश ब्रिक्सच्या अमेरिकाविरोधी धोरणांबरोबर जाईल, त्या देशांवर १० टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादलं जाईल, तसेच या धोरणाला कोणताही देश अपवाद असणार नाही, अशी इशारावजा धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. तसेच डोनाल्ड ट्रम्प यांनी BRICS देशांनाही आर्थिक भुर्दंडाचा इशारा दिला होता. त्यानंतर काही दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी थेट रशियाला धमकी दिली होती की जर व्लादिमीर पुतिन यांनी ५० दिवसांत युक्रेन बरोबरील युद्धबंदी करण्यास सहमती दर्शवली नाही तर रशिया विरुद्ध कठोर टॅरिफ लागू करण्यात येईल. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला पुन्हा एकदा धमकी देत रशियाला १० ते १२ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.'व्लादिमीर पुतिन यांच्याकडे युक्रेन शांतता कराराला सहमती देण्यासाठी फक्त पुढील १० किंवा १२ दिवस आहेत.

### कठोर निर्बंधांना सामोरं जावं लागेल

पुढील १० किंवा १२ दिवसात रशियाने शांतता कराराला सहमती दिली नाही तर रशियाला कठोर निर्बंधांना सामोरं जावं लागेल', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. तसेच युक्रेनबरोबरील संघर्ष लांबवल्यामुळे व्लादिमीर पुतिन यांच्यावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली आहे. "काय होणार आहे हे त्यांना माहित असल्यामुळे इतकी वाट पाहण्यात काही अर्थ नाही", असं ट्रम्प म्हणाले आहेत. या संदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं की,"रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याबद्दल निराशा वाढल्यामुळे आता मी कठोर निर्बंधांबाबतचं सुधारित वेळापत्रक तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. मी त्यांना दिलेले ५० दिवस कमी करणार असून आता मॉस्कोला १० ते १२ दिवसांचा कालावधी असेल.

---

# पुढील २० वर्षे तुम्ही तिथेच बसणार

## अमित शाह विरोधकांवर संतापले; सभागृहात काय घडलं?

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. संसदेत ऑपरेशन सिंदूरसंदर्भात चर्चा सुरू आहे. या चर्चेवेळी मंत्री एस. जयशंकर हे लोकसभेत बोलते होते. भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधीवेळी मोदी आणि ट्रम्प यांच्यात फोन झाला होता का? भारत-पाकिस्तानमधील शस्त्रसंधीवेळी ट्रम्प यांनी खरंच मध्यस्थी केली होती का? या संदर्भातील स्पष्टीकरण मंत्री एस. जयशंकर लोकसभेत देत होते. मात्र, यावेळी विरोधकांनी गोंधळ करण्याचा प्रयत्न करत सरकारला काही प्रश्न विचारले.**




तसेच मंत्री एस. जयशंकर लोकसभेत बोलत असताना विरोधकांनी केलेल्या गोंधळावरून गृहमंत्री अमित शाह हे विरोधकांवर चांगलेच संतापल्याचं पाहायला मिळालं. मंत्री एस. जयशंकर बोलत असताना विरोधकांच्या गदारोळामुळे मध्येच गृहमंत्री अमित शाह उभे राहिले आणि विरोधकांवर जोरदार टीका केली. भारताचे परराष्ट्र मंत्री सभागृहात बोलत आहेत. मात्र, विरोधकांना भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांवर विश्वास नाही. पुढील २० वर्षे तुम्ही तिथेच (विरोधातच) बसणार, असं म्हणत अमित शाह यांनी विरोधकांनी सुनावलं.एवढ्या गंभीर विषयावर चर्चा होत असते, तेव्हा सरकारच्या एका महत्त्वाच्या खात्याच्या मंत्र्यांचं भाषण सुरु असताना त्यांना थांबवणं तुम्हाला शोभत नाही. ते (विरोधी पक्ष) भारतीय परराष्ट्र मंत्र्यांवर विश्वास ठेवत नाहीत, तर दुसऱ्या देशातील व्यक्तीवर विश्वास ठेवतात. यावर माझा आक्षेप आहे. त्यामुळे विरोधकांच्या पक्षात परदेशी व्यक्तींचं महत्त्व किती आहे हे मी समजू शकतो. पण याचा अर्थ असा नाही की त्यांच्या पक्षाने जे काही म्हटलं ते सर्व सभागृहात लादलं पाहिजे.आणि पुढील २० वर्षे तिथेच राहतील", अशा शब्दांत गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांना सुनावलं. शस्त्रसंधीवेळी पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात फोनवरून संवाद झाला होता की नाही?

### आपली विमानं किती पडली?

याचा खुलासा आता देशाचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज संसदेत बोलताना केला आहे. २२ एप्रिल ते १७ जून या कालावधीत पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात कोणताही संवाद झाला नसल्याचं स्पष्टीकरण मंत्री एस. जयशंकर यांनी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान बोलताना दिलं आहे.ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेदरम्यान लोकसभेत बोलताना राजनाथ सिंह यांनी म्हटलं की, "आजही आपले विरोधक विचारतात पाकिस्तानने भारताची किती विमानं पाडली ते सांगा. मला वाटतं राष्ट्रीय जनभावनेचा हा अनादार आहे. कारण त्यांनी एकदाही आम्हाला हे विचारलं नाही की आपल्या सैन्य दलांनी पाकिस्तानची किती विमानं पाडली? मी विरोधकांना हे सांगू इच्छितो की त्यांना प्रश्न विचारायचा असेल तर त्यांनी हे जरुर विचारावं की भारताने दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले का? तर त्याचं उत्तर आहे हो.

# धडक २ भूमिकेकडून खूप शिकायला मिळालं



अभिनेत्री तृप्ती डिमरी सध्या करण जोहरची निर्मिती असलेल्या 'धडक २' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामधून तिच्यासह अभिनेता सिद्धार्थ चतुर्वेदीही मुख्य भूमिकेत झळकणार आहे. अशातच अभिनेत्रीने चित्रपटातील भूमिकेबद्दल बोलताना खासगी आयुष्यातील काही अनुभव सांगितले आहेत. तृप्ती डिमरी व सिद्धार्थ चतुर्वेदी यांची मुख्य भूमिका असलेला चित्रपट 'धडक २' येत्या १ ऑगस्टला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. यामध्ये तृप्तीने विधी तर सिद्धार्थने निलेश हे पात्र साकारलं आहे. आता अभिनेत्रीने तिला चित्रपटातील तिच्या भूमिकेकडून खूप काही शिकायला मिळाल्याचं म्हणत खऱ्या आयुष्यामध्येही तिच्यातील गुण आत्मसात करायला आवडतील याबाबत सांगितलं आहे.तृप्ती डिमरी म्हणाली, "मी खूप अंतर्मुख स्वभावाची आहे. खूप गोष्टींना सामोरी गेली आहे आणि कधीच त्या विरोधात काहीच बोलले नाही. ३० वर्षांच्या आयुष्यात मी कितीतरी गोष्टींबद्दल मौन बाळगले आहे. माझी कधी हिंमत झाली नाही लोकांना सांगण्याची की हे चुकीचं आहे वगैरे. मी शाझियाला (चित्रपटाची दिग्दर्शिका) म्हणाले की, मला विधीसारखं व्हायचं आहे, कोणालाही न घाबरता खरं बोलण्याचं धाडस असणं गरजेचं आहे; आता मी गोष्टींसाठी उभी राहते." 'धडक २' चित्रपटाचं शाझिया इक्बालने दिग्दर्शन केलं आहे.

# मी 'बिग बॉस'मध्ये कधीच जाणार नाही

छोट्या पडद्यावरील कायमच चर्चेत राहणारा शो म्हणजे 'बिग बॉस'. मराठीसह हिंदीमध्ये हा शो प्रेक्षक पाहतात. त्यामुळे या शोचे असंख्य चाहते आहेत. 'बिग बॉस'च्या प्रत्येक पर्वासाठी चाहते मंडळी वाट पाहत असतात. अशातच लवकरच 'बिग बॉस १९' सुरू होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून 'बिग बॉस १९'ची चर्चा होताना पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस १९' हा शो लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे आणि या शोमध्ये टीव्ही आणि बॉलीवूड विश्वातील कोणते कलाकार सहभागी होणार या चर्चाही सुरू झाल्या आहेत. 'बिग बॉस'च्या आगामी पर्वात सहभागी होणाऱ्या अनेक कलाकारांच्या नावांच्या चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहेत. यापैकीच एक नाव म्हणजे अभिनेत्री मल्लिका शेरावत.'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होण्याच्या यादीत मल्लिका शेरावतचं नाव असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होताना दिसत आहे. मात्र, आज (२८ जुलै) रोजी मल्लिकाने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर करत या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.
या पोस्टमध्ये अभिनेत्री नेमकं काय म्हणाली?
चला जाणून घेऊ...'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चांवर उत्तर देत मल्लिकाने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे आणि या स्टोरीमध्ये ती असं म्हणते,



"या सर्व अफवांना आता पूर्णविराम! मी 'बिग बॉस' शो करत नाहीय आणि यापुढेही कधीच करणार नाही. धन्यवाद."मल्लिकापूर्वी, अभिनेत्री डेजी शहा, अभिनेते राम कपूर आणि गौरव तनेजा हेही 'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. मात्र याबद्दल त्यांनी स्वत: प्रतिक्रिया व्यक्त करत शोमध्ये सहभागी होणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.दरम्यान, 'बिग बॉस १९'मध्ये कोणते कलाकार दिसणार, याबद्दलचे अनेक वृत्त समोर येत आहेत. या वृत्तांमधून नील मोटवानी, अर्हान अन्सारी, शशांक व्यास, खुशी दुबे, शरद मल्होत्रा, मून बॅनर्जी आणि लता सबरवाल या नावांचा समावेश आहे. पण अद्याप याबद्दल कोणतीच ठोस माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे बिग बॉस १९ मध्ये नक्की कोण कोण सहभागी होणार? हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. दरम्यान, मल्लिका शेरावतच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती शेवटची २०२४ मध्ये आलेल्या 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' या चित्रपटात पाहायला मिळाली होती. या चित्रपटात तिची मुख्य भूमिका नव्हती, तरी तिच्या अभिनयाने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं होतं. छोट्या

पडद्यावरील कायमच चर्चेत राहणारा शो म्हणजे 'बिग बॉस'. मराठीसह हिंदीमध्ये हा शो प्रेक्षक पाहतात. त्यामुळे या शोचे असंख्य चाहते आहेत. 'बिग बॉस'च्या प्रत्येक पर्वासाठी चाहते मंडळी वाट पाहत असतात. अशातच लवकरच 'बिग बॉस १९' सुरू होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून 'बिग बॉस १९'ची चर्चा होताना पाहायला मिळत आहे. 'बिग बॉस १९' हा शो लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे आणि या शोमध्ये टीव्ही आणि बॉलीवूड विश्वातील कोणते कलाकार सहभागी होणार या चर्चाही सुरू झाल्या आहेत. 'बिग बॉस'च्या आगामी पर्वात सहभागी होणाऱ्या अनेक कलाकारांच्या नावांच्या चर्चा सध्या सोशल मीडियावर होत आहेत. यापैकीच एक नाव म्हणजे अभिनेत्री मल्लिका शेरावत.'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होण्याच्या यादीत मल्लिका शेरावतचं नाव असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होताना दिसत आहे. मात्र, आज (२८ जुलै) रोजी मल्लिकाने इन्स्टाग्राम स्टोरीवर एक पोस्ट शेअर करत या सर्व चर्चांना पूर्णविराम दिला आहे.
या पोस्टमध्ये अभिनेत्री नेमकं काय म्हणाली?
चला जाणून घेऊ...'बिग बॉस १९'मध्ये सहभागी होणार असल्याच्या चर्चांवर उत्तर देत मल्लिकाने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे आणि या स्टोरीमध्ये ती असं म्हणते,

# अमिताभ बच्चन यांच्यासह काम करण्यास दिला नकार

अमिताभ बच्चन हे ॅलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेते आहेत. आजही त्यांची प्रेक्षकांमध्ये पूर्वीसारखीच क्रेझ कायम आहे. आजही ते त्यांच्या अभिनयानं अनेकांची मनं जिंकतात. परंतु, एक काळ असा होता जेव्हा त्यांचे चित्रपट फ्लॉप ठरत होते. तेव्हा निर्माते त्यांना चित्रपटात घ्यायचे नाहीत. अशातच लोकप्रिय दिग्दर्शिकेनं याबाबत सांगितलं आहे. अरुणा राजे पाटील यांनी अमिताभ बच्चन यांच्याबद्दल सांगितलं आहे. त्यांनी सततच्या फ्लॉप चित्रपटांमुळे निर्माते बिग बींना चित्रपटात भूमिका द्यायचे नाहीत याबाबत सांगितलं आहे.
तर त्यामुळेच एका चित्रपटातून अमिताभ यांना रिप्लेस करण्यात आल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. 'बॉलीवूड क्रिप्ट'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये त्यांनी याबाबत सांगितलं आहे.अरुणा यांनी १९७६ रोजी आलेल्या 'शक' चित्रपटातून अमिताभ बच्चन यांना रिप्लेस करण्यात आल्याबद्दल सांगितलं आहे. त्या म्हणाल्या, "चित्रपटाचे निर्माते ठाम होते की, त्यांना अमिताभ बच्चन यांच्याबरोबर काम करायचं नव्हतं. कारण- त्यावेळी त्यांचा बॉक्स ऑफिस रेकॉर्ड खराब होता."अरुणा पुढे म्हणाल्या, "'शक' चित्रपटासाठी आमची पहिली पसंती अमिताभ बच्चन व वहिदा रहमान यांना होती. परंतु, अमिताभ यांचा चित्रपट फ्लॉप ठरल्याने निर्माते एन. बी. कामत यांनी अमिताभ बच्चन यांची निवड करण्यास नकार दिला. ते आम्हाला म्हणाले, "हा चित्रपट होऊ शकत नाही. म्हणून आम्ही म्हटलं की ठीक आहे; मग कोणाची निवड करायची? तेव्हा त्यांनी आम्हाला दुसऱ्या अभिनेत्याची निवड करा, ज्याची ओळख असेल, असं सांगितलं. त्यामुळे आम्ही विनोद खन्ना यांचा विचार केला. त्यानंतर कामत यांची त्यांच्यासह मीटिंग झाली आणि त्यांनी या चित्रपटासाठी होकार दिला."अरुणा पुढे अमिताभ यांच्या 'जंजीर' चित्रपटाबद्दल म्हणाल्या, त्यांच्या नशिबातच तो चित्रपट होता. त्या म्हणाल्या, "दिग्दर्शक प्रकाश मेहरा यांनी 'जंजीर'साठी आधी दिलीप कुमार, धर्मेंद्र, देव आनंद, राजकुमार यांना विचारलं होतं. हा चित्रपट पूर्णपणे नायकावर आधारित होता. तरीसुद्धा त्यातील प्रत्येकानं काहीतरी कारणांमुळे चित्रपटासाठी नकार दिला. नंतर अमिताभ यांना विचारणा झाली. ज्यावेळी त्यांना कोणीही चित्रपटासाठी विचारत नव्हतं आणि प्रकाश मेहरा यांच्याकडे काही पर्याय नव्हता तेव्हा जया यांनी दिग्दर्शकांना अमिताभ यांचं नाव सुचवलं आणि नंतर जे घडलं ते सर्व जण जाणतात."'जंजीर'च्या यशानंतर अमिताभ 'दीवार', 'शोले', 'काला पत्थर', 'त्रिशूल', 'मजबूर', 'डॉन' यांनासारख्या चित्रपटांत झळकले. त्यातून मग ते खऱ्या अर्थाने नावारूपाला आले.


# हा भारतीय बुद्धिबळाचा सुवर्णक्षणच!

## मराठमोळ्या दिव्या देशमुखने हम्पीला पराभूत करत जेतेपद पटकावलं

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताची युवा बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने इतिहासाला गवसणी घातली आहे. दिव्याने एफआयडीई विश्वचषक स्पर्धेतील अंतिम फेरीत ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीचा पराभव करत विश्वविजेतेपद जिंकलं आहे. १९ वर्षीय दिव्या देशमुख टायब्रेकरमध्ये गेलेल्या सामन्यात उत्कृष्ट चाली चालत कोनेरू हम्पीला हार मानायला भाग पाडलं आणि विजय मिळवला.**





जॉर्जियाच्या बटुमी येथे झालेल्या एफआयडीई महिला विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या दोन्ही लेकी एकमेकांविरूद्ध खेळत होत्या. दिव्या देशमुखने अनुभवी कोनेरू हम्पीला टायब्रेकमध्ये पराभूत करून शानदार विजय मिळवला. या विजयामुळे दिव्या देशमुख भारताची चौथी महिला ग्रँडमास्टर बनण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे गेली आहे. ही स्पर्धा तब्बल २४ दिवस चालली आणि अंतिम फेरीत दिव्याने अत्यंत संयम, कौशल्य आणि आत्मविश्वास दाखवून या ऐतिहासिक कामगिरीची मानकरी ठरली आहे.यासह दिव्या देशमुखे बुद्धिबळ विश्वचषकाचे जेतेपद पटकावणारी पहिली महिला भारतीय बुद्धिबळपटू ठरली आहे. १९ वर्षीय दिव्या ही तिची प्रतिस्पर्धी असलेल्या अनुभवी हम्पीच्या निम्मया वयाची होती. कोनेरू हम्पी ही ग्रँडमास्टर बनणारी भारताची पहिली महिला आहे. हम्पी ग्रँडमास्टर झाल्यापासून, फक्त दोन महिलांनीच ग्रँडमास्टर होण्याचा मान पटकावला आहे. आजच्या वर्ल्डकप अंतिम फेरीतील विजयासह दिव्या दिग्गजांच्या मांदियाळीत आपलं स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरली.सोमवारी, पहिला गेम अनिर्णित राहिल्यानंतर, हम्पीच्या चुकीमुळे दिव्याने दुसरा टायब्रेक गेम जिंकला. हम्पी आणि दिव्या यांच्यातील पहिले दोन्ही क्लासिकल गेम अनिर्णित राहिले. शनिवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या गेममध्ये दिव्याला कोनेरू हम्पी आणि दिव्या देशमुख यांच्यातील पहिल्या दोन क्लासिकल डावांचा निकाल बरोबरीत लागला होता. शनिवारी झालेल्या पहिल्या डावात दिव्या पांढऱ्या मोहऱ्यांसह खेळत होती आणि तिच्याकडे सामना जिंकण्याची चांगली संधी होती. तिने चांगली रणनीती आखली होती आणि पटावर स्पष्ट आघाडी घेतली होती. मात्र शेवटी, तिने काही चुकीच्या चाली खेळल्या आणि त्यामुळे हम्पीला सामना पुन्हा बरोबरीवर आणण्याची संधी मिळाली.कोनेरू हम्पीवर मात करत विश्वविजेतेपद पटकावताच दिव्याला अश्रू अनावर झाले. त्यानंतर दिव्या तिच्या आईला बिलगून ढसाढसा रडताना दिसली. जगभरातून दिव्याचं कौतुक केलं जात आहे.दिव्याने २०१० मध्ये केवळ पाचव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. इतर अनेक भारतीय पालकांप्रमाणेच तिचे पालक डॉ. जितेंद्र आणि नम्रता यांनी तिला जवळच्या बुद्धिबळ अकादमीत घातले. नागपूरच्या शंकर नगर येथील त्यांच्या वसाहतीत बॅडमिंटन, बास्केटबॉल आणि बुद्धिबळ असे तीन खेळ शिकवले जात होते. दिव्याची मोठी बहीण आर्या बास्केटबॉल आणि बॅडमिंटन खेळत होती, तर दिव्याला तिच्या आई-वडिलांनी बुद्धिबळ निवडून दिला.त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नाही. २०१३ मध्ये इराणमध्ये झालेल्या आशियाई स्पर्धेत तिने अंडर ८ विजेतेपद मिळवत आपली आंतरराष्ट्रीय छाप सोडली. त्यानंतर ती पुढील वर्षी वर्ल्ड युथ चॅम्पियनशिपसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरली. २०१४ मध्ये, वयाच्या अवघ्या आठ वर्षे आणि पाच महिन्यांत, तिने दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे अंडर१० वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकली. ११ फेऱ्यांच्या या स्पर्धेत तिने ९ विजय आणि २ बरोबरीसह अजिंक्यपद मिळवले.

### स्पर्धा तब्बल 24 दिवस चालली

जॉर्जियाच्या बटुमी येथे झालेल्या एफआयडीई महिला विश्वचषक स्पर्धेत, भारताच्या दोन्ही लेकी एकमेकांविरूद्ध खेळत होत्या. दिव्या देशमुखने अनुभवी कोनेरू हम्पीला टायब्रेकमध्ये पराभूत करून शानदार विजय मिळवला. या विजयामुळे दिव्या देशमुख भारताची चौथी महिला ग्रँडमास्टर बनण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे गेली आहे. ही स्पर्धा तब्बल २४ दिवस चालली आणि अंतिम फेरीत दिव्याने अत्यंत संयम, कौशल्य आणि आत्मविश्वास दाखवून या ऐतिहासिक कामगिरीची मानकरी ठरली आहे.यासह दिव्या देशमुखे बुद्धिबळ विश्वचषकाचे जेतेपद पटकावणारी पहिली महिला भारतीय बुद्धिबळपटू ठरली आहे. १९ वर्षीय दिव्या ही तिची प्रतिस्पर्धी असलेल्या अनुभवी हम्पीच्या निम्मया वयाची होती. कोनेरू हम्पी ही ग्रँडमास्टर बनणारी भारताची पहिली महिला आहे. हम्पी ग्रँडमास्टर झाल्यापासून, फक्त दोन महिलांनीच ग्रँडमास्टर होण्याचा मान पटकावला आहे.

# "तू वेडा होतास हे मला माहितीये"

## ऋषभ पंतसाठी कर्णधार सूर्यकुमार यादवने केलेली पोस्ट चर्चेत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना अनिर्णित राहिल्यानंतरही मालिकेत यजमान संघ २-१ ने पुढे आहे. पाचवा आणि अखेरचा कसोटी सामना ओव्हलच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. हा कसोटी सामना ३१ जुलैपासून सुरू होईल. पण या सामन्यापूर्वी भारताचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत स्पर्धेबाहेर झाला आहे. त्याच्या जागी नव्या खेळाडूला संघात सामील केलं**





मँचेस्टर कसोटीच्या पहिल्या दिवशी ऋषभ पंत फलंदाजी करत असताना ख्रिस वोक्सच्या चेंडूवर स्वीप खेळायला गेला आणि चेंडू त्याच्या उजव्या पायाला लागला. यानंतर पंत वेदनेने कळवळताना दिसला. त्याच्या पायाला इतक्या वेदना होत होत्या की तो जमिनीवर पाय देखील ठेवू शकत नव्हता. क्षणार्धात त्याचा पाय देखील सुजला. यानंतर लगेच कार्टमधून त्याला मैदानाबाहेर नेण्यात आलं. मैदानाबाहेर गेल्यानंतर पंतला लगेच हॉस्पिटलमध्ये नेलं आणि स्कॅन करण्यात आलं. यामध्ये त्याचा पाय फ्रॅक्चर झाला होता. पाय फ्रॅक्चर झालेला असतानाही पंत दुसऱ्या दिवशी फलंदाजीला उतरला.

### ऋषभ पंतसाठी खास पोस्ट

विकेटदरम्यान धावतानाही त्याला त्रास होत होता, पण तरीही त्याने जिद्दीने फलंदाजी करत अर्धशतक झळकावलं. आता सूर्यकुमार यादवनेही त्याचं कौतुक केलं आहे.बीसीसीआयने चौथी कसोटी संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी एक व्हीडिओ शेअर केला आहे. यामध्ये भारताचा कोच गौतम गंभीर ऋषभ पंतचं कौतुक करताना दिसत आहे आणि संपूर्ण संघ टाळ्या वाजवत त्याला दाद देत आहेत. हा व्हीडिओ सूर्याने शेअर करत पंतचं कौतुक केलं आहे.सूर्याने इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये गौतम गंभीरचं नावं घेतलं आहे. त्यानंतर खाली त्याने ऋषभ पंतला टॅग करत लिहिलं, "मला माहितीये तू वेडा होतास पण पूर्ण वेडा आहेस ते आता कळलं." यानंतर खाली हॅशटॅगमध्ये लिहिलं, #झुकेगानही आणि पुढे नजर न लागण्याचा इमोजी वापरला आहे. सूर्यादादाची ही भन्नाट इन्स्टाग्राम स्टोरी चर्चेत आहे.यानंतर सूर्याने पुढच्या स्टोरीमध्ये ध्रुव जुरेलचा फोटो शेअर करत त्याचं कौतुक केलं आहे. प्लेईंग इलेव्हनचा भाग नसतानाही फक्त यष्टीरक्षणासाठी मैदानावर येणं सोपं नसतं, असं म्हणत सूर्याने त्याचं कौतुक केलं आहे.

# महाईन्यूज

ePaper

। मंगळवार ।

। दि. 29 जुलै 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# कारगिल युद्धातील शौर्यकथेच्या सादरीकरणाने वातावरण भारावले!

## शिक्षण विश्व: अभिषेक इंटरनॅशनल स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस साजरा

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**अभिषेक इंटरनॅशनल स्कूलमध्ये कारगिल विजय दिवस अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये विविध सादरीकरणे आणि भाषणे यांद्वारे या दिवसाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.**




कार्यक्रमातील विशेष क्षणांपैकी एक होता विद्यार्थी कार्तिक राठोड याचे प्रभावी भाषण, ज्यामध्ये त्याने कारगिल विजय दिवसाचे महत्त्व अत्यंत सहज आणि मार्मिकपणे मांडले. याशिवाय अर्चना सूर्यवंशी यांनी देखील विचारप्रवर्तक भाषण करून या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकेमध्ये कारगिल युद्धातील शौर्यकथा अत्यंत जिवंतपणे सादर करण्यात आल्या. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेले जोशपूर्ण नृत्य प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून गेले.

मुख्य पाहुणे कॅप्टन सुनील डोबळे यांनी संरक्षण दलांची भूमिका आणि कारगिल विजयाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की सामान्य नागरिकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करून देशासाठी योगदान देता येते. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी उपस्थित सर्वांवर अमीट छाप पाडली.या कार्यक्रमाला इयत्ता १०वी आणि १२वीचे विद्यार्थी, पालक, शिक्षक, कार्यकारी संचालक तसेच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांची उपस्थिती कार्यक्रमाच्या प्रतिष्ठेला आणि महत्त्वाला अधिक अधोरेखित करणारी ठरली.

कार्यक्रमाचा समारोप प्रतीक लोणकर यांच्या आभारप्रदर्शनाने करण्यात आला आणि कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्रीमती सुरेखा तांबे यांनी केले. एकूणच हा कार्यक्रम भारतीय सशस्त्र दलांच्या शौर्य आणि बलिदानाला वाहिलेली एक गौरवमयी श्रद्धांजली ठरली.

# वीर जवानांच्या शौर्याला विद्यार्थ्यांची मानवंदना!

## शिक्षण विश्व: मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही.के. माटे हायस्कूलमध्ये कारगिल विजय दिन साजरा

**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही.के. माटे हायस्कूलमध्ये कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी वीर जवानांच्या शौर्याच्या आठवणींना उजाळा देत हुतात्म्यांना मानवंदना दिली.**




या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रत्यक्ष कारगिल युद्धामध्ये सहभाग घेतलेले व कारगिल टेकडीवर सर्वात प्रथम भारताचा तिरंगा फडकवणारे वीर श्रीमान जिगेंद्र कुमार पारस वाला आणि त्यांची मुलगी स्मिता माळी मॅडम हे होते. तसेच माजी सैनिक भारतीय सेना श्रीमान अरुण सिंग, मार्शल कॅडेट फोर्स चे संचालक जाधव साहेब, एम. सी .एफ .चे ट्रेनर सचिन सर आणि इस्रा मुल्ला इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच या युद्धामध्ये बलिदान दिलेल्या सर्व सैनिकांना मानवंदना देण्यात आली.देशभक्ती ,शौर्य, बलिदान या मूल्यांची जाणीव करून देण्यासाठी शाळेमध्ये कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे जिगेंद्रसिंग पारस वाला यांनी आपल्या मनोगतात हा दिवस फक्त विजय दिवस म्हणून साजरा करण्यासाठी नसून शहीद जवानांची आठवण ठेवण्याचा आणि त्यांचा आदर करण्याचा दिवस आहे ,असे सांगून कारगिल युद्धाची पार्श्वभूमी सांगितली मे 1999 ते जुलै 1999 या दरम्यान भारतातील कारगिल ,ब्रास ,बटालिक या भारताच्या पर्वतमय भागात पाकिस्तानी सैनिकांनी आणि घुसकरांनी एलओसी चे उल्लंघन करून भारताच्या नियंत्रण असणाऱ्या उंच पर्वतीय भागांवर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा भारतीय लष्कराने ऑपरेशन विजय ही मोहीम चालून वरील सर्व ठिकाणांवरून घुसखोरांना पिटाळून लावले. 26 जुलै 1999 ला भारताने पूर्ण नियंत्रण मिळवले .त्यामुळे 26 जुलै हा दिवस कारगिल विजय दिन म्हणून पवित्र मानला जातो. भारताने पाकिस्तान विरुद्ध निर्णायक विजय होता ,त्यामुळे या दिवसाचे महत्त्व जास्त आहे.असे सांगितले. प्रमुख पाहुणे श्रीमान जिगेन्द्र कुमार पारस वाला यांनी या युद्धा तील प्रसंगाचे वर्णन केले. व याच युद्ध कर्तव्य बजावत असताना त्यांना तीन गोळ्या लागण्याचे सांगितले. तसेच दुसरे प्रमुख पाहुणे अरुण सिंग यांनीही आपले अनुभव सांगून सांगून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती शौर्य हे मूल्य जागृत केले. कार्यक्रमाला शाळेचे उपमुख्याध्यापक दिलीप कुमावत पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे, शिक्षक समन्वयक संजय खेडकर तसेच विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत हुचगोळ यांनी केले तर मान्यवर आणि उपस्थित यांचे आभार सौ अनिता बोरसे यांनी मानले. कार्यक्रमासाठी देव सर यांनी नियोजन केले.

# सामंजस्य करारामुळे संशोधन विकासात नव्या संधी!

## ज्ञानेश्वर लांडगे : कोरिया मधील आयसीसीके-पीसीईटीमध्ये सामंजस्य करार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोरिया मधील आयसीसीके आणि पीसीईटी यांच्या मध्ये झालेल्या ऐतिहासिक सामंजस्य करारामुळे भारतातील शैक्षणिक व उद्योग क्षेत्रास उपयोग होईल. त्यातून सांस्कृतिक सहकार्याला देखील चालना मिळेल तसेच दोन्ही देशातील संशोधन आणि व्यावसायिक विकासात अनेक नव्या संधी उपलब्ध होतील असे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले.**



शुक्रवारी (दि. २५ जुलै) इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स इन कोरिया (आयसीसीके) आणि पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. यावेळी ज्ञानेश्वर लांडगे बोलत होते. पीसीईटीच्या ट्रस्ट कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात आयसीसीकेचे चेअरमन आणि टीसीएस दक्षिण कोरिया चे प्रमुख रमेश अय्यर, क्रॉसकाउंटी इन्फोटेकच्या वैदेही कुलकर्णी, पीसीटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीसीओई चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय संबंध सल्लागार डॉ. दिनेश अमळनेरकर, पीसीसीओई आंतरराष्ट्रीय संबंध विभाग अधिष्ठाता डॉ. रोशनी राऊत, विद्यार्थी विकास आणि कल्याण विभाग प्रमुख डॉ. पद्माकर देशमुख, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. के. राजेश्वरी आदी उपस्थित होते.

यावेळी पीसीईटी चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले की, हा करार म्हणजे भारत आणि कोरिया या दोन देशांमधील शिक्षण, वाणिज्य, उद्योग, व्यापार, रोजगार, संशोधन या क्षेत्रात वाढ होण्यासाठी उपयुक्त आणि इतर विद्यापीठांना मार्गदर्शक ठरेल. आणि जागतिक पातळीवर या दोन्ही संस्थांना आणखी सक्षमपणे प्रतिनिधित्व करण्यासाठी चालना मिळेल. पीसीईटीच्या विद्यार्थ्यांना कोरियामध्ये आणि कोरिया मधील विद्यार्थ्यांना भारतामध्ये येऊन शिक्षण संशोधन करण्यासाठी हा करार उपयुक्त ठरेल. यातून सांस्कृतिक देवाणघेवाण व विद्यार्थी विनिमय कार्यक्रम अधिक सक्षमपणे राबवता येईल. नवउद्योजकांना संयुक्तपणे संशोधन करून आपले उद्योग प्रकल्प विकसित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय साधण्यासाठी एक सक्षम व्यासपीठ निर्माण होईल, यामुळे दोन्ही देशातील अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

उपाध्यक्ष पद्माताई भोसले यांनी सांगितले की, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे विद्यार्थी केंद्रित उपक्रम आहेत. या ट्रस्ट अंतर्गत संचलित होणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये व संशोधन केंद्रांमध्ये प्रवेश घेण्यास पालक व विद्यार्थ्यांची पहिली पसंती असते. नव्याने स्थापन झालेल्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयु) देखील असेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना उद्योजक व रोजगार सक्षम करण्यात येत आहे. पीसीईटीच्या हजारो विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचे नाव उज्वल केले आहे याचा विश्वस्तांना व येथील प्राध्यापकांना अभिमान वाटतो.

Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI

2025-26
ADMISSIONS
OPEN

PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI

42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION

50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS

Contact Us Now
86687 55826
98232 31705

Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105




Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046